<u>नियमित दिवाणी दावा क्र.४१/२०२० मधील अर्ज नि.क्र.८१ वरील आदेश</u>

<u>CNRMHSN06000349-2020</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र .६ व प्रतिवादी क्र.१३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे . वादीचा अर्ज व त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे वाचले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादीच्या अर्जामधील कथन असे की , सदर कामातील प्रतिवादी क्र.६ हे दिनांक १६/०८/२०१० रोजी व प्रतिवादी क्र.१३ हे दिनांक २०/११/२०१२ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र.६ व १३ यांच्या मृत्युची माहिती वादी यांना दावा दाखल करताना नव्हती. तसेच जाणुनबुजून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता वादींनी टाळाटाळ केलेली नव्हती. कोरोना परिस्थितीमुळे व वारसांची माहिती मुदतीत न मिळालेने प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झालेला आहे. सबब त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने सदर अर्जास नि.क्र.९३ कडे म्हणणे देवुन जोरदार विरोध दर्शवला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, वादी यांचा अर्ज चालणेस पात्र नाही . वादींनी प्रस्तुतचा दावा २०२० साली दाखल केलेला आहे. वादींनी दावा दाखल करण्यापुर्वी ८ ते १० वर्षांपर्वी सदर प्रतिवादी क्र.६ व १३ मयत झालेले आहेत, असे असताना मयतांच्या नावे प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. अर्जामध्ये किती दिवसांचा विलंब झालेला आहे हे नमुद केलेले नाही . सबब त्यांनी वादीवर रक्कम रुपये ५,०००/– कॉस्ट बसवुन वादींचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जामधील कथने वादीने शपथेवर सांगितलेली आहेत . वारस अभिलेखावर आणण्यासाठी ९० दिवसांपेक्षा जास्त विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र.६ व प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब हा कोरोना परिस्थितीमुळे व वारसांची माहिती मुदतीत न मिळालेने दिसतो. दावा हा वाटपासाठी , कब्जासाठी व हक्कज्ञापन होवुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.६ व प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस रेकॉर्डवर आल्यास इतर प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. अर्जात नमुद केलेले कारण योग्य व

संयुक्तिक वाटते. त्यामुळे वादीस एक संधी देणे योग्य वाटते. वारस रेकॉर्डवर आल्यास दाव्याचा अंतिम गुणदोषावर न्यायनिर्णय देण्यास मदत होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वारस दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

मिरज.
दि. ०७/०४/२०२२

**( स्वाती भा. नाईकनवरे–गरड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | S. K. Jadhav (L.G.) |
| Court. | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date. | : | 07/04/2022 |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 07/04/2022 |
| Order uploaded on. | : | 08/04/2022 |